# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ/नों. क्र. २००५८६/२०/अ. क्र. ५८५/२३/०१**
**क्र. मुमाआ/नों. क्र. २००५८८/२०/अ. क्र. ५८७/२३/०१**
**क्र. मुमाआ/नों. क्र. २००५८९/२०/अ. क्र. ५८८/२३/०१**

**श्री. किसन ना.जाधव**
मुंबई जनसत्ता, साप्तहिक,६/३९०,
करदोडी इमारत, ना.म. जोशी मार्ग,
मुंबई ४०० ०११.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.२) जी/दक्षिण विभाग,**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त,जी/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,
१ ला मजला, धनमिल कंपाऊंड, एन.एम. जोशी मार्ग, परेल, मुंबई ४०० ०१३.
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग कार्यकारी अधिकारी जी/दक्षिण विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त,जी/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,
१ ला मजला, धनमिल कंपाऊंड, एन.एम. जोशी मार्ग, परेल, मुंबई ४०० ०१३.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १२.०६.२०२३**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०६.०६.२०१९ | १९.०६.२०१९ | १७.०७.२०१९ | १८.०९.२०१९ |
| ०६.०६.२०१९ | २२.०६.२०१९ | १७.०७.२०१९ | १८.०९.२०१९ |
| ०६.०६.२०१९ | २६.०६.२०१९ | १७.०७.२०१९ | १८.०९.२०१९ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०१.०२.२०२० रोजीच्या अर्जान्वये खालील कारण नमूद करुन तीन वेगवेगळे द्वितीय अपीले दाखल केलेले आहेत:-

"सदर अर्जाची कागदपत्रे निरीक्षण देण्याचे आदेश प्रथम अपीलधारकांनी दि. २३.१२.२०१३ दिले. त्यानुसार मी त्या दिवशी उपस्थित होतो. तरी मला कागदपत्रे दाखविण्यात आले नाही. मोबाईलवर संपर्क केला तरी माहिती देतो अशी आश्वासने देऊन टाळाटाळ करतात."

अपिलार्थी यांनी दि. ०६.०६.२०१९ अन्वये तीन वेगवेगळे माहिती सादर करुन विशेष वर्क कोड संबंधित खालील मुद्यांवर माहिती विचारलेली आहे:-

१. "वर्क ऑर्डर.

२. इस्टेमेट प्रत व मेजरमेंट.

३. बिल प्रत.

४. लोकेशन स्केच.

५. बक गॅरेन्टी व त्याचे सर्टीफाय प्रत.

६. फोटो कामापूर्वी व नंतरचे सिडीमध्ये.

७. काम पाहणारे पालिका अभियंताचे नाव.

८. सदर कामाचा हमी कालावधी.

९. मटेरियल चलन व टेस्टींग रिपोर्ट.

१०. लेबर पॉलिसी आणि जनता पॉलिसी.

११. दर्जाहिन कामाबाबत पालिकेने ठोठावलेला दंड व तो कोणत्या बिलातून वसूल केला याची माहिती मिळावी.

१२. सर्व कागदपत्रे यांचे निरीक्षण संधी देऊन देण्यात यावे."

अपिलार्थी यांनी त्यांच्या प्रत्येक व्दितीय अपील अर्जासोबत जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. १९.०६.२०१९ (अ. क्र. ५८५), दि. २२.०६.२०१९ (अ. क्र. ५८७), दि. २६.०६.२०१९ (अ. क्र. ५८८) व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. १८.०९.२०१९ (वरील सर्व प्रकरणांमध्ये) संलग्न केलेले आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दि. १९.०६.२०१९ (अ. क्र. ५८५), दि. २२.०६.२०१९ (अ. क्र. ५८७), दि. २६.०६.२०१९ (अ. क्र. ५८८) अन्वये अपिलार्थीना खालीलप्रमाणे उत्तर दिलेले आहे:-

"आपणास हवी असलेली माहिती हि विस्तृत स्वरुपाची उपलब्ध असून प्रत्यक्ष पाहणी करुन शुल्क या विभागात भरणा केल्यानंतर देण्यात येईल."

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे शेरे नोंदवून दि. १९.०९.२०१९ रोजी (वरील सर्व प्रकरणांमध्ये) खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहे:-

"अपीलकर्ता श्री. किसन ना. जाधव यांना दि. २३.०९.२०१९ रोजी दु. ३ ते ५ या वेळेत बोलावून नियमाप्रमाणे निरीक्षण देऊन हवी असलेली माहिती देण्याचे आदेश सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांना देण्यात आले."

जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी कोणतीही सूचना न देता अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपीलार्थी यांनी असे सादर केले की, कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध माहिती १५ दिवसांत नोंदणीकृत टपालाव्दारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ७(६) मधील तरतुदीच्या अनुषंगाने, निशुल्क पुरवावी.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि. ०६.०६.२०१९ रोजीच्या तीन माहिती अर्जाला अनुसरून विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरूध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या २० (१) अन्वये प्रत्येक प्रकरणांत रू. २५,०००/- ची शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा ३० दिवसांत त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरून शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३) वरील तीन अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

State Information Commission Maharashtra

**(सुनील पोरवाल)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १२.०६.२०२३**

**प्रत :** तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.२) जी/दक्षिण विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त,जी/दक्षिण विभाग यांचे कार्यालय, १ ला मजला, धनमिल कंपाऊंड, एन.एम. जोशी मार्ग, परेल, मुंबई ४०० ०१३ – विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी या आदेशाची प्रत संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना पोच करावी व त्याची पोच आयोगाला सादर करावी.

